# 100 दिवसाचा 7 सुत्री कार्यक्रम - कृती आराखडा व अहवाल

सोलापूर ग्रा. पोलीस


## १. कार्यालयीन कामकाज व तक्रार निवारण कामकाजाचे मुल्यमापन-

- अ) डायल 112 प्रणालीवर पोलीस स्टेशनचा प्रतिसाद / वेळ - एकुण कॉल - 9,238 व रिस्पॉन्स टाईम - 00.10.68 मिनीट
- आ) पिडीत व्यक्तीला मालमत्ता परत केल्याच्या प्रकरणांची संख्या आणि मालमत्तेचे मुल्य - 157 वाहने किंमत 30553400/-, 92 किंमती मुद्देमाल - किंमत 8583724/- तसेच इतर 18 मुद्देमाल किंमत 1024740/- परत करण्यात आलेला आहे.
- इ) न्यायालयाच्या आदेशानुसार मुद्देमालाची विल्हेवाट लावणे - एकुण 4164 मुद्देमालाची विल्हेवाट लावण्यात आलेली आहे.
- ई) आपले सरकार पोर्टलवरील तक्रारींचे निराकरण ( दिनांक 30 एप्रिल 2025 पुर्वीच्या तक्रारी निरंक करणे) - आपले सरकार पोर्टलचे प्राप्त 258 अर्जापैकी सर्व 258 व पी.जी. पोर्टलचे 42 अर्जापैकी 42 अर्जाची निर्गती करण्यात आले आहेत
- उ) अभ्यागत भेटींचे नियोजन व भेटींच्या वेळांबाबत प्रसिध्दी - देण्यात आली असुन डिजीटल अभ्यागत व्यवस्थापन प्रणालीव्दारे अभ्यागतांची नोंद घेण्यात येत आहे.
- ऊ ) चारित्र्य पडताळणी अर्जाच्या निराकरणाची टक्केवारी - (2025 मध्ये एकुण प्राप्त पारपत्र 3662 प्रकरणे पैकी 3336 निर्गती (91 %) व चारित्र्य पडताळणी 9037 पैकी 8261 निर्गती (92 %) केली आहे.)

# संकेतस्थळ अद्यावतीकरण https://solapurpolice.gov.in

**सोलापूर ग्रा. पोलीस**

- सोलापूर ग्रा.पोलीस दलाची वेबसाईट ही सेक्युरिटी ऑडीटसह अद्ययावत आहे.
- सदर संकेतस्थळावर नागरिकांकरीता 22 प्रकारच्या सेवा उपलब्ध आहेत. (लोकसेवा हक्क अधिनि./माहिती अधिकार अधिनि. इ.)








# 2) सुकर जीवनमान : कार्यालय तसेच पोलीस ठाणे येथे येणारे अभ्यांगत यांचे साठी बैठक व्यवस्था व पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे.

सोलापूर ग्रा. पोलीस

- **अ) नागरी सेवांचे सुलभीकरण -**
- **१) कार्यालय तसेच पोलीस ठाणे येथे येणारे अभ्यांगत यांचे साठी बैठक व्यवस्था व पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे.**
- **2) पारपत्र व चारित्र्य पडताळणी सेवा - (2025 मध्ये एकुण प्राप्त पारपत्र 3662 प्रकरणे पैकी 3336 निर्गती व चारित्र्य पडताळणी 9037 पैकी 8261 निर्गती केली आहे.)**









## 2) सुकर जीवनमान :

सोलापूर ग्रा. पोलीस

- उपक्रम क्र. 1 - भरोसा सेल - सन 2024 मध्ये एकुण 51 व 17.04.2025 अखेर एकुण 06 बालविवाह रोखले आहेत.
- उपक्रम क्र. 2 - निर्भया पथक - महिलांच्या सुरक्षिततेकरीता उपविभाग स्तरावर 7 निर्भया पथक कार्यान्वित आहेत. तसेच तक्रारदाराची ओळख गोपनिय राहणे करीता तक्रार ही QR कोड आधारित केली आहे.









## 2) सुकर जीवनमान : भरोसा सेल/निर्भया पथक मार्फत कमी वेळात महिलांविषयक तक्रांरीचे गोपनिय पध्दतीने निरसण करण्साठी डिजिटल अभ्यागत व्यवस्थापन प्रणाली

**उद्दिष्ट:** अभ्यागत नोंदणी आणि पाठपुरावा सुलभ करणे, पोलिस विभागाची चांगली प्रतिमा वाढवणे.

**दृष्टीकोन:** QR कोड-आधारित डिजिटल नोंदणीस्वयंचलित फॉलो-अप सिस्टमडेटा-चालित निर्णय घेणे

**अंमलबजावणी :** जलद फॉर्म तयार करण्यासाठी आणि QR कोड जनरेशनसाठी datasink.in चा वापर करा.
सुलभ अभ्यागत नोंदणीसाठी प्रतीक्षालयात QR कोड ठेवा.
datasink.in डॅशबोर्ड वापरून अभ्यागत डेटाचे निरीक्षण करा आणि फॉलोअप करा.

**फायदे :** १. प्रतीक्षा कक्षात क्यूआर कोड, २. डिजिटल डेटा कॅप्चर, ३. फॉलो-अप सिस्टम, ४. सुधारित पोलिस प्रतिमा
५. डेटा ॲनालिटिक्स, ६. सर्वात कमी खर्च आणि १ तास अंमलबजावणी वेळ, वापरकर्ता अनुकूल, भारतीय सर्व्हर.

## महिलांच्या सुरक्षेसाठी एआय चॅटबॉट

- **QR कोडद्वारे तक्रार दाखल करणे** - महाविद्यालये आणि वसतिगृहांमध्ये QR कोडद्वारे जलद प्रवेश-
श्रेणी निवड: आपत्कालीन, मध्यम, कमी प्राधान्य

- **थेट तक्रार मार्ग**

-तक्रारी थेट एसपीच्या डेस्कवर पाठवल्या जातात

-वेब डॅशबोर्ड आणि मोबाइल ॲपद्वारे रिअल

--टाइम देखरेख- गंभीर प्रकरणांसाठी ईमेल आणि SMS द्वारे सूचना

# 2) सुकर जीवनमान : उपक्रम क्र. 3 - पहाट :- गुन्हेगार पुन:र्वसन कार्यक्रम

सोलापूर ग्रा. पोलीस

## नाविन्यपुर्ण कार्यक्रम

उद्दिष्टे

**समुपदेशनासाठी तज्ञांची टिम**
डॉक्टर,मानसोपचार तज्ञ, समुपदेशक,सामाजीक कार्यकर्ते, कायदेशिर मदत

**प्रशिक्षण कार्यक्रम**
ड्रायव्हिंग प्रशिक्षण,आणि परवाना, तरुणांसाठी कौशल्य विकास, महिलांसाठी बचत गट

**दत्तक**
पोलीस ठाणे निहाय आरोपी दत्तक घेणे

**पर्यायी उदरनिर्वाह**
अकुशल मजुर, चहाची दुकाने, पशुपालन, शेती, कुशल कामगार इ.

**शिक्षण**
मुलांच्या शिक्षणाची सोय

# पहाट :- गुन्हेगार पुन:र्वसन कार्यक्रम

सोलापूर ग्रा. पोलीस











सकाळ

## पारधी समाजबांधवांच्या जीवनात उजाडणार ‘पहाट’

### गुन्हेगारीच्या अंधारातून बाहेर काढण्यासाठी ग्रामीण पोलिसांचा उपक्रम

**सोलापूर, ता. ७ :** जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील पारधी समाजबांधवांसाठी जिल्हा पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून 'पहाट' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाची सुरुवात झाल्यामुळे जिल्ह्यातील भटके विमुक्तांना गुन्हेगारीच्या अंधारातून बाहेर पडण्यासाठी सोनेरी किरण गवसला आहे.

ग्रामीण पोलिस विभागाकडील मालमत्तेच्या गुन्ह्यांचे अभिलेख पाहता यात भटके विमुक्त (पारधी) समाजातील संशयित व आरोपी मोठ्या प्रमाणात असल्याचे आढळून आले. या समाजातील युवक रोजी - रोटीसाठी अनावधानाने गुन्हे करतात. त्यात अटक झाल्यानंतर जामीन, त्यासाठी वकिलाचे शुल्क यासह कुटुंबाचे भरणपोषण याचा खर्च भागविण्याचे आव्हान त्यांच्यासमोर असते. त्यातून सुटण्यासाठी पुन्हा गुन्हेगारी, पुन्हा अटक या दुष्टचक्रात ते अडकतात. ते भेदून त्यांना सन्मानाने जगता यावे, यासाठी ग्रामीण पोलिस त्यांना मदत करणार आहे.

#### कागदपत्रे देण्यासाठी विशेष शिबिर

भटक्या विमुक्त समाजातील लोकांना सरकारी योजना व नोकरी यासाठी विविध कागदपत्रे लागतात. मात्र, त्यांच्याकडे ती नसतात. त्यामुळे त्यांना आधार कार्ड, रेशन कार्ड, मतदान कार्ड, जातीचा दाखला आदी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यासाठी विशेष शिबिर आयोजित केले जाणार आहेत.

#### शिकवणी, भरतीपूर्व प्रशिक्षण मिळणार

**सोलापूर** : सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या पहाट उपक्रमाच्या शुभारंभानिमित्त घेतलेल्या पारधी समाजबांधवांच्या बैठकीत मार्गदर्शन करताना पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी.

युवकांनी शिक्षण घेतले तरी त्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही. शिवाय आर्थिक अडचणीही असतात. त्यामुळे त्यांना नोकरी मिळावी, याकरिता शिकवणी, प्रशिक्षण या सारख्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. याद्वारे बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्यात येणार आहे.

#### आधी धाराशिवमध्ये राबविली, गुन्हेगारीवर नियंत्रण

पोलिस अधीक्षक कुलकर्णी यांनी धाराशिवमध्ये कार्यरत असताना हा उपक्रम राबविला होता. पारधी समाजातील मुलांच्या शिक्षणासाठी शाळा, युवकांना भरतीपूर्व प्रशिक्षण व रोजगार उपलब्ध करुन दिले. परिणामी गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवता आले. त्यामुळे पोलिस अधीक्षक कुलकर्णी यांनी सोलापूर जिल्ह्यातही हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला.

#### समाजाच्या बैठकीत योजनांची माहिती

“ पोलिस अधीक्षक तेजस्विनी सातपुते यांच्या काळातही समाजाचा मेळावा घेण्यात आला. मात्र, त्यातून पुढे काही साध्य झाले नाही. आता गुन्हेगारीतून बाहेर काढण्यासाठी रोजगार मिळवून देणे, कागदपत्रे उपलब्ध करुन देणे यासाठी पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सुरू केलेला पहाट उपक्रम स्तुत्य आहे. या प्रयत्नातून निश्चितच समाजाला दिशा मिळेल, याविषयी समाजबांधवांना आशा आहे.

**- ज्ञानेश्वर भोसले**, अध्यक्ष, भारतमाता आदिवासी पारधी समाज व भटके विमुक्त विकास संस्था, मोहोळ

पोलिस अधीक्षक कुलकर्णी यांनी शुक्रवारी (ता. ६) पोलिस मुख्यालयात जिल्ह्यातील पारधी समाजबांधवांसह पोलिस अधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे सहाय्यक संचालक सरतापे यांनी पारधी समाजासाठीच्या योजनांची माहिती दिली. तसेच पोलिस विभागाच्या माध्यमातून या योजनांचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचविण्याची ग्वाही दिली. या बैठकीस अपर पोलिस अधीक्षक प्रीतम यावलकर यांच्यासह उपविभागीय अधिकारी उपस्थित होते.

Solapur, Main
08/09/2024 Page No. 2

## 3) कार्यालयीन स्वच्छता / व्यवस्था


**सोलापूर ग्रा. पोलीस**

- अ) अभिलेख निंदणीकरण व वर्गीकरण - अभिलेखाचे वर्गीकरण, नष्ट करणे, जड संग्रह नोंदवही, अद्यावतीकरण, जुन्या व निरुपयोगी जड वस्तुंची विल्हेवाट इ. योजना राबविल्या आहेत. त्यामध्ये एकुण 51 प्रकरणांचे (955 कि.ग्रॅ.) निंदणीकरण तसेच वर्गीकरण करण्यात आलेले आहे.
- आ) मुदतबाहय अभिलेख नष्ट करणे - एकुण 51 मुदतबाहय अभिलेख नष्ट करण्यात आलेले आहेत.
- इ) जड वस्तु संग्रह नोंदवही अद्ययावतीकरणे - जडवस्तु संग्रह नोंदवही अद्ययावत केले आहे.
- ई) जुन्या व निरुपयोगी जड वस्तुंची विल्हेवाट - जुन्या व निरोपयोगी वस्तुंची संख्या 65 असुन त्यापैकी 60 वस्तुंची विल्हेवाट करण्यात आली आहे. तसेच पोलीस दलातील एकुण 37 जुन्या वाहनांचे निर्लेखन केलेले आहे.

Before




After



Before



After



QR कोड आधारित मुद्देमाल प्रणाली





# मुद्देमाल निर्गती तक्ता दिनांक 01.01.2025 ते 17.04.2025

**सोलापूर ग्रा. पोलीस**

| अ. क्र. | घटकाचे नांव | दाखल मुद्देमाल दिनांक 1.1.2025 to 17.04.2025 | | | | | निर्गती मुद्देमाल दिनांक 1.1.2025 to 17.04.2025 | | | | | प्रलंबीत मुद्देमाल दिनांक 17.04.2025 | | | | | DISPOSED % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भाग 5 | भाग 6 | दारु | मयत | एकुण | भाग 5 | भाग 6 | दारु | मयत | एकुण | भाग 5 | भाग 6 | दारु | मयत | एकुण | |
| 1 | सोलापूर ग्रा. | 1551 | 423 | 1114 | 61 | 3149 | 2039 | 566 | 1539 | 112 | 4256 | 22755 | 1954 | 1920 | 628 | 27257 | 136 |

➢ (उ) पोलीस ठाणे आवारात असलेल्या बेवारस वाहनांचा व इतर वस्तुंची विल्हेवाट - **मुद्देमाल निर्गती - पोलीस ठाणे स्तरावर सन 2024 मध्ये एकुण 9,180 व सन 2025 मध्ये 4,256 मुद्देमाल कायदेशिर प्रक्रिया राबवुन निर्गती केलेला आहे. तसेच सोलापूर ग्रा.पोलीस दलाने दिनांक 17 एप्रिल 2025 अखेर बेवारस, जुनी दुचाकी, चारचाकी अशा 647 वाहनाचा मुद्देमालासह इतर 92 किंमती मुद्देमालाची देखील विशेष मोहिम घेवुन निर्गती केली आहे.**












## गुन्हे निर्गती :-

सोलापूर ग्रा. पोलीस

# गुन्हे निर्गती दिनांक 17.04.2025 पर्यंत

| अ क्र | शिर्षक | दि.31/12/2023 अखेर प्रलंबीत गुन्हे | सन 2024 दाखल गुन्हे | दि.17/04/2025 अखेर दाखल गुन्हे | एकुण प्रलंबीत गुन्हे (3+4+5 ) | 17.04.2025 अखेर निर्गती केलेले गुन्हे | दि. 17/04/2025 अखेर एकुण प्रलंबीत गुन्हे | निर्गती % | प्रलंबीत % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** |
| 1 | **Part 5** | 2394 | 7273 | 1879 | **11546** | 8623 | **2923** | **75** | 25 |
| 2 | **Part 6** | 1023 | 4084 | 1616 | **6723** | 5691 | **1032** | **85** | 15 |
| 3 | **Prov.** | 484 | 4572 | 1007 | **6063** | 5391 | **672** | **89** | 11 |
| 4 | **A.D.** | 1092 | 2614 | 582 | **4288** | 2883 | **1405** | **67** | 33 |
| एकुण | | **4993** | **18543** | **5084** | **28620** | **22588** | **6032** | **79** | **21** |

# तक्रारी अर्ज निर्गती तक्ता :-

सोलापूर ग्रा. पोलीस

## तक्रारी अर्ज निर्गती व प्रलंबीत (Govt. & D.G/IG Office) 2024-2025

| अ.क्र. | घटकाचे नांव | एकुण दाखल तक्रारी अर्ज | निर्गती केलेले अर्ज | एकुण प्रलंबीत अर्ज | निर्गती % | प्रलंबीत % |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सोलापूर ग्रा. | 5088 | 5029 | 59 | 99 | 01 |

## स्थानिक तक्रारी अर्ज निर्गती तक्ता 2024-2025

| अ.क्र. | घटकाचे नांव | एकुण दाखल तक्रारी अर्ज | निर्गती केलेले अर्ज | एकुण प्रलंबीत अर्ज | निर्गती % | प्रलंबीत % |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सोलापूर ग्रा. | 10464 | 10414 | 50 | 99.5 | 0.5 |






## 4) कार्यालयीन सोई सविधा:-

सोलापूर ग्रा. पोलीस

- अ) कायमस्वरुपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली आहे.
- आ) कर्मचारी व अभ्यागत यांच्यसाठी स्वच्छ प्रसाधनगृहाची व्यवस्था केली आहे
- इ) अभ्यागतांसाठी सुसज्ज प्रतिक्षालय व्यवस्था - आहे.
- ई) कार्यालयामध्ये सुव्यस्थित नामफलक व दिशादर्शक फलक लावले आहे.
- उ) कार्यालयाचे सौंदर्यीकरणे - करण्यात आलेले आहे.







Before

After









# 5) क्षेत्रीय कार्यालयांना भेटी :-

सोलापूर ग्रा. पोलीस

➢ अ) आठवडयातुन किमान 2 दिवस क्षेत्रीय कार्यालयांना भेट देऊन पाहणी करणे -

| अ.क्र. | विभाग | भेटींची संख्या |
|---|---|---|
| 1 | पोलीस अधीक्षक | 27 |
| 2 | अपर पोलीस अधीक्षक | 23 |
| 3 | उपविभागीय पो. अधिकारी | 225 |

➢ आ) केंद्र व राज्य शासनाच्या महत्वाच्या कार्यक्रम प्रकल्पांना भेटी देवुन अंमलबजावणी व पर्यवेक्षण करणे-

➢ इ) क्षेत्रीय भेटी दरम्यान ग्रामपंचायत, शाळा, अंगणवाडी व प्राथमिक आरोग्य केंद्र यांना भेटी देवुन कामकाजावर देखरेख ठेवणे-

➢ ई) ग्रामस्तरावरील कर्मचा-यांचे अनुभव, अडचणी व सुचना यावर त्वरीत कार्यवाही करणे-



Before



After





## 6) आर्थिक व औदयोगिक गुंतवणुकीस प्रोत्साहन -



- अ) गुंतवणुकदार उदयोजकांना प्रोत्साहन देण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे - गुंतवणुकदार उदयोजकांना प्रोत्साहन देण्यासाठी पोषक वातावरण तयार करण्यात आलेले आहे.
- आ) व्यापारी/ कामगार संघटनांशी चर्चा करुन त्यांच्या अडचणी सोडविणे - त्याबाबत सर्व संबंधीतांच्या पोलीस ठाणे स्तरावर 38, उपविभागीय स्तरावर 07 तसेच जिल्हा स्तरावर 01 बैठका घेण्यात आलेल्या आहेत.
- इ) गुंतवणुकदार उदयोजकांच्या अडचणींचे निराकरण करणे- बैठक घेवुन उदयोजकांच्या अडचणींचे निराकरण करण्यात आलेले आहे.
- ई) गुंतवणुकदार उदयोजकांसाठी कायदा व सुव्यवस्था प्रभावीपणे हाताळणे - कायदा व सुव्यवस्था प्रभावीपणे राबविण्यात येत असुन प्रस्तुत प्रकरणामध्ये 02 गुन्हे पोलीस ठाणे स्तरावर दाखल करण्यात आलेले आहेत.






## 7) अधिकारी/ कर्मचारी प्रशिक्षण,नविन कायद्याचा प्रसार व प्रसिध्दी :-

सोलापूर ग्रा. पोलीस

- अ) 03 नविन फौजदारी कायद्यामध्ये प्रशिक्षित कर्मचा-यांची टक्केवारी - एकुण 160 पोलीस अधिकारी व 2379 पोलीस अंमलदार यांना (100 % ) नविन फौजदारी कायदयाचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.
- आ) 03 नविन फौजदारी कायद्याचा जनतेत प्रसार व प्रसिध्दी - नविन 03 फौजदारी कायदयाचा सोलापूर ग्रामीण घटकातील सर्व पोलीस ठाणेकडुन जनतेमध्ये प्रसार व प्रसिध्दी करण्यात आली आहे.







## ४) नाविण्यपुर्ण उपक्रम :-

सोलापूर ग्रा. पोलीस

- **सोलापूर ग्रा. कार्यालयाकडील नाविण्यपुर्ण उपक्रम -**
- अ) उपक्रम क्र. 1 - AI तंत्रज्ञानाचा वापर
- आ) उपक्रम क्र. 2 - स्मार्ट कॉप ॲप
- इ) उपक्रम क्र. 3 - शेतकरी प्रेरणा अभियान उपक्रम
- ई) उपक्रम क्र. 4 - मृत्युंजय दुत योजना - अपघात समयी मदत करणाऱ्यांचा सन्मान



सोलापूर तरुण भारत

प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक

epaper.dainiktarunbharat.com
14 Feb 2025 - Page 8

### अपघात समयी मदत करणाऱ्यांचा मृत्यूजंय दूत पुरस्कार देऊन होणार सन्मान

● वैभव भोई व विनोद भोसले यांचा पोलिस अधिक्षकांच्या हस्ते सत्कार

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी - अपघात समयी मदत करणाऱ्यांना मृत्यूजंय दूत पुरस्कार देऊन गौरव करण्याचा उपक्रम पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी सुरु केला असून गुरुवारी पोलिस अधिक्षकांच्या हस्ते वैभव भोई व विनोद भोसले या दोघांना हा पुरस्कार देण्यात आला.

मागील काही वर्षांमध्ये शासनाकडून दळणवळण सुलभ होण्यासाठी चांगल्या प्रकारचे रस्ते बांधणी सुरु आहे. यामुळे वाहनांना चांगल्या प्रकारचे रस्ते व सुविधा मिळत असल्याने प्रवासांचा वेळ कमी झाला आहे. तसेच रस्त्यावर अपघात देखील होत आहेत. रस्ते अपघातामध्ये अपघात मिळाल्यानंतर जखमींना वेळीच मदत मिळाल्यास तसेच वैद्यकीय उपचार मिळाल्यास त्यांचा प्राण वाचू शकतात. अपघातामध्ये वेळीच व तात्काळ मदत करणाऱ्या व्यक्तींचे कौतुक करण्यासाठी पोलिस अधिक्षक कुलकर्णी यांनी मृत्यूजंय दूत हा पुरस्कार सुरु केला आहे. त्याम ध्ये महिनाभरामध्ये जिल्ह्यातील अपघातामध्ये मदत करणारे नागरिकांचा प्रशंसापत्र देवून गौरव करण्यात येत आहे.

१३ फेब्रुवारी रोजी पोलिस मुख्यालयातील संवाद हॉलमध्ये आयोजित क्राईम बैठकीत बोलावून वैभव भोई व विनोद भोसले यांना प्रशंसापत्र व पुष्पगुच्छ देवून सन्मानीत करण्यात आले. अपघाताम ध्ये मदत करणारे लोकांना पोलीस तपासाच्या कोणताही त्रा होणार नाही याची हमी पोलीस अधिक्षकांनी यावेळी दिली.

**रुग्णवाहिका बोलावून जखमीस रुग्णालयात पाठविणारा विनोद भोसले**

३ फेब्रुवारी २०२५ रोजी विनोद भास्कर भोसले (रा. लवंग, ता. माळशिरस) हे त्यांच्या मोटार सायकलवरून टेंभूर्णीतून अकलूजकडे जात असताना आंभूळबेट पाटीजवळ एका इसमास अज्ञात वाहनाने धडक देवून गंभीर जखमी केले होते. तो इसम जखमी अवस्थेत विव्हळत पडला होता. तेथे बऱ्याच बघ्यांची गर्दी जमली होती. परंतु कोणीही मदतीला धावले नाही. विनोद भोसले यांनी तेथील परिस्थीती पाहून ॲम्ब्युलन्सचा टोल फ्री क्रमांक १०८ वर फोन करून ॲम्ब्युलन्स घटनास्थळावर बोलावून जखमीस उपचारासाठी रुग्णालयात पाठवून दिले. तसेच त्याबाबतची माहिती पोलीसांना देखील दिली. त्यांच्या या कार्यास देखील मृत्यूजंय दूत पुरस्कार देण्यात आला.

**कोळेगावजवळील अपघातात मदत करणारा वैभव भोई**

९ फेब्रुवारी २०२५ रोजी मोहोळ पोलीस ठाणेच्या हद्दीतून जाणाऱ्या कोळेगावजवळ सोलापूरहून पुण्याकडे जाणारी खाजगी प्रवाशी बसचा अपघात झाला होता. अपघातामध्ये बस पलटी होवून बसमध्ये असलेल्या प्रवाशांपैकी १५ प्रवाशी जखमी झाले होते. अपघातानंतर थे हजर असणारा वैभव दत्तात्रय भोई (रा. वडापूर, ता. दक्षिण सोलापूर) यांनी आपल्या पायात चप्पल नसताना देखील आपल्या जिवाची परवा न करता पायाने लाथा मारून बसच्या काचा फोडून बसमध्ये अडकलेल्या जखमी व इतर नागरिकांना रस्त्यावरून येणारे जाणारे वाहनांना विनंती करून उपचारासाठी रुग्णालयात पाठविले होते. त्यांच्या प्रशंसनिय व अतुलनिय कामासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून दखल घेऊन मृत्यूजंय दूत पुरस्कार देण्यात आला.



लोकमत

### ..जखमींचे प्राण वाचविले; दोघांचा खाकीनं केला सन्मान

**विनोद भोसले आणि वैभव भोई ठरले मृत्युंजय दूत**

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** अपघातातील जखमींचे प्राण वाचविणाऱ्या दोन तरुणांचा सोलापूर ग्रामीण पोलिसांनी मृत्युंजय दूत म्हणून सन्मान केला. पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते हा सन्मान सोहळा पार पडला. यावेळी अप्पर पोलिस अधीक्षक प्रीतम यावलकर यांच्यासह अन्य वाहतूक शाखेचे अधिकारी उपस्थित होते.

अकलूज पोलिस ठाण्याच्या हद्दीत 3 फेब्रुवारी २०२५ रोजी अपघात झाला. या अपघातातील जखमींना मदत करण्यासाठी विनोद भास्कर भोसले (रा. लवंग, ता. माळशिरस) याने जिवाची पर्वा न करता मदतीसाठी धाव घेतली. त्याने जखमींना वेळेवर उपचारासाठी पाठविण्यासाठी मोठी मदत केली. याशिवाय मोहोळ पोलिस ठाण्याच्या हद्दीत कोळेगाव येथे अपघात झाला. या अपघातातील जखमींना वाचविण्यासाठी वैभव दत्तात्रय भोई (रा. कोळेगांव, ता. मोहोळ) याने मोठी मदत केली. या दोघांनी केलेल्या मदतीची दखल सोलापूर ग्रामीण पोलिसांनी घेतली असून, दोघांचा सन्मान करून प्रमाणपत्र देण्यात आले. यासाठी जिल्हा वाहतूक नियंत्रण शाखेचे बाळासाहेब भरणे, पोलिस उपनिरीक्षक दशरथ काळे यांच्यासह अन्य अधिकारी परिश्रम घेतले.

२
जिल्ह्यात मागील आठवड्यात दोन ठिकाणी अपघात


Hello Solapur
Page No. 4 Feb 14, 2025
Powered by: erelego.com

# नाविण्यपुर्ण उपक्रम :- AI तंत्रज्ञानाचा वापर

**सोलापूर ग्रा. पोलीस**

- श्री क्षेत्र पंढरपूर वारी बंदोबस्त A.I. चा वापर (गर्दी, आपत्ती व पोलीस बंदोबस्त व्यवस्थापन) कृत्रिम तंत्रज्ञानाचा वारी करीता वापर करुन येणाऱ्या भाविकांचे जिवीत व मालमत्तेचे संरक्षण करणेसाठी नाविन्यपुर्ण उपक्रम राबविला असून यापुढेदेखील याचा वापर करणार आहोत.

- AI चे फायदे :- गर्दीचे व्यवस्थापन, अलर्ट संदेश, ट्रॅकिंग सिस्टीम,
- या प्रणालीमुळे वेळ, कागदपत्रे व मनुष्यबळ बचत होते.
- पोलीस बंदोबस्ताची ऑनलाईन नोंदणी व ऑनलाईन बंदोबस्त वाटप. मोबाईल नंबरवर Text SMS द्वारे महत्वाच्या सुचना
- Geo-fencing च्या माध्यमातुन अधिकारी/अंमलदार कर्तव्यावर उपस्थित आहेत अगर कसे, त्यांचे नांव ब.नं. सह गुगल मॅपवर पाहता येते.









# नाविण्यपुर्ण उपक्रम :- स्मार्ट कॉप ॲप

सोलापूर ग्रा. पोलीस

## ➢ क्राईम डिटेक्शन मॅपिंग :- प्रमुख वैशिष्टये:

- ➢ सर्व गुन्हे परस्पर संवादी नकाशावर रचले जातात.
- ➢ व्हिज्युअलायजेशन: गुन्हयांची ठिकाणी आणि नमुने ओळखण्यास मदत होते.
- ➢ प्रत्येक गुन्हयाबद्दल तपशीलवार माहिती. ऑनलाईन दैनिक क्राईम रिपोर्टिंग- मोबाईल बेस
- ➢ जेल रिलीज आणि गहाळ व्यक्ती डेटा ऍक्सेस. गुन्हे फाइल व्यवस्थापन
- ➢ गुन्हेगार भेट अहवाल, गस्त स्थान वाटप आणि चेक - इन घटना अहवाल आणि वाहन ट्रॅकिंग आणिबाणी बजर अलर्ट

## ➢ रिपीट ऑफेंडर :-

- ➢ गुन्हेगारांविरुध्द वारंवार गुन्हे दाखल केले जातात त्यांची तपशीलवार माहिती संग्रहित करते.
- ➢ अधिकारी गुन्हेगारांना भेटु शकतात, ज्यामध्ये नाव, पदनाम, भेटीचा कालावधी आणि गुन्हेगाराची प्रतिमा समाविष्ट आहे. कोणत्या गुन्हेगारांना एकदा, अनेक वेळा भेट देण्यात आली किंवा भेट दिली याचे विश्लेषण करु शकतो.
- ➢ वेळीच आरोपीवर प्रतिबंधक कारवाई करण्यात येते.

## ➢ नाकाबंदी व्यवस्थापन


- ➢ एकाच वेळी संपूर्ण जिल्हयात नाकाबंदी लावण्यात येते. अचानक नाकाबंदी लावण्यात येते.
- ➢अचानक नाकाबंदी लावून ऑनलाईन पध्दतीने चेक करता येते.

## ➢ टॉवर/ सीसीटीव्ही/ पार्किग स्लॉट

➢ घटनेच्या तपासासाठी उपलब्ध टॉवर्स किंवा सीसीटीव्ही कॅमेरे पाहण्यासाठी अधिकारी त्यांच्या सभोवतालची सीसीटीव्ही ॲप मध्ये पाहू शकतात. जवळच्या सीसीटीव्ही कॅमे-यामधून रिअल- टाइम फुटेज मिळवता येते.


## ➢क्राईम सीन मॅनेजमेंट


➢सोलापूर ग्रामीण जिल्हयात एकाच वेळी ऑनलाईन पध्दतीने नाईट राउंन्ड लावण्यात येते. तसेच त्यांना एकावेळी चेक करता येते.




# नाविण्यपुर्ण उपक्रम :- स्मार्ट कॉप ॲप

सोलापूर ग्रा. पोलीस



## शेतकरी प्रेरणा अभियान उपक्रम :- शेती संबधीत गुन्हे आणि शेतकरी आत्महत्त्या रोखण्यासाठी उपायोजना

**सोलापूर ग्रा. पोलीस**

### उद्दिष्टे

- जागेवरच जमीन/सिमा विवाद सोडविण्यासाठी जिल्हा व्यापी मोहिम
- जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांचे अधिपत्त्याखाली समिती
- तहसिलदार (नोडल) बीडीओ,पोलीस ठाणे प्रभारी तालुका स्तरावर
- नैसर्गिक शेतीच्या सर्वोत्तम पध्दतीचा अवलंब व प्रशिक्षण सत्र
- पोलीस पाटील, स्वयंसेवी संस्था व स्वयंसेवकाकडून अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी समुपदेशन सत्र
- संकटग्रस्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी आंतरविभागीय समन्वय
- मार्केटींग स्थानिक व शहरी शेतबाजार पेठ
- एकुण 756 वाद मिटवले आहेत.